**निशाणी ०५ वरील आदेश**

**( प्रिती लब्दे पूर्वाश्रमीची प्रिती राणे वि. गंगाराम पारकर व.९)**

**सीएनआरनं.एमएचएसआय०४-०००९५३-२०२५**

प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रकिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ प्रमाणे तूर्तातूर्त मनाई ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

३. वादी व प्रतिवादी यांची कथने विचारात घेता, माझ्या समोर पुढील प्रमाणे मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसहित पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीना सकृतदर्शनी केस असल्याचे दिसून येते का ? | **नाही** |
| २. | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे का ? | **नाही** |
| ३. | सदरचा अर्ज नामंजुर झालेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे का ? | **नाही** |
| ४. | आदेश काय ? | **वादीचा अर्ज नामंजूर करणेत येतो.** |

-::- **कारणमिमांसा** -::-

**मुद्दा क्र.१ करीता:-**

४. दावा प्रलंबित असताना तुर्तातुर्त ताकीदीची मागणी मंजुर करणे ही न्यायालयाच्या विवेकाधीन अनुतोषाशी निगडीत असणारी बाब आहे. असा न्यायालयीन विवेकाधीकार वापरताना खालील घटक पडताळून पाहणे आवश्यक असते. अ) वादींना सकृतदर्शनी केस आहे का ? ब) न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे का? आणि क) अर्ज नाकारल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल का?

**५.** वादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही वादी घराण्याची एकत्र कुटुंबाची मालकी हक्काची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची समाईक मिळकत आहे. दावा मिळकतीमध्ये वादीच्या वडीलांचे नाव म्हणजेच संपतराव राणे यांचे नाव इतर सहहिस्सेदारंसह असून वादी त्यांना एकमेव वारस आहेत. दावा मिळकतीचे सातबारा सदरी मालक व कब्जेदार म्हणून वादीच्या वडीलांचे व त्यांचे कुटुंबातील अन्य सदस्यांची नावे नमूद आहे. दावा मिळकतीमध्ये वादी व त्यांचे कुटुंबिय यांचीच कब्जेवहिवाट आहे. असे असताना दि. ०५.१२.२०२५ पासून प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करून वादी यांची पूर्व परवानगी न घेता घराचे बांधकाम सुरू केलेले आहे. त्यास वादी यांनी हरकत घेतली असता, प्रतिवादी यांनी त्यांना धमकी देवून दावा मिळकतीमध्ये असणारा वादी यांचा हक्क नाकारलेला आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांचेविरूध्द कायम मनाईसाठी दावा दाखल केला असून प्रस्तुतचा दावा अंतिमत: निकाली होईपर्यंत प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये कोणतेही बांधकाम करू नये म्हणून प्रतिवादी यांचेविरूध्द तूर्तातूर्त मनाई आदेश पारीत व्हावा, अशी विनंती वादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी केलेली आहे.

**६.** प्रतिवादी यांचे कथनानुसार वादी यांच्या प्रस्तुत अर्जातील सर्व कथने ही वस्तुस्थिती विपरीत असून ती त्यांना मान्य व कबूल नाहीत. वादी व प्रतिवादींचे पूर्व हक्कदार यांचेदरम्यान दावा मिळकत व अन्य मिळकतींबाबत टेनन्सी केस क्रमांक ०४/१९९८ ची केस दाखल होती. सदर दाव्याचे कामी वादीचे चुलते प्रतापराव राणे वगैरे हे जागा मालक व प्रतिवादी हे दावा मिळकत व अन्य मिळकतीमधील कुळ असलेबाबतचा वाद सदर दाव्याचे कामी न्यायनिर्णयीत होत असताना दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी हे कुळ असल्याचा ठराव टेनन्सी न्यायालयाने दिलेला आहे. त्या निर्णयाविरूध्द प्रतापराव राणे यांनी केलेले टेनन्सी अपील क्र.२६/२००० चे अपील

रद्द करण्यात येवून दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी हे कुळ असल्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर प्रतापराव राणे यांनी दावा मिळकत व अन्य मिळकतींबाबत प्रतिवादी यांचेविरूध्द कुडाळ येथील दिवाणी न्यायालयात रे.दि.मु.नं.२६/२००० चा ठराव, कायम मनाईचा व कब्जा मिळणेसाठीचा दावा दाखल केला होता. त्याकामी देखील या न्यायालयाने दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांची कब्जेवहिवाट असल्याचे निष्कर्ष नोंदविलेले होते. त्याविरूध्द प्रतापराव राणे यांनी मा.जिल्हा न्यायालयात रे.दि.अ.क्र.२०४/२००३ चे अपील दाखल केले होते. त्याकामी देखील मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब यांनी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांची कुळ म्हणून कब्जेवहिवाट असलेबाबतचा निष्कर्ष दिलेला आहे. या सर्व घटनाक्रमांचा विचार करता, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांची मा.न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे कायदेशीर कब्जेवहिवाट आहे. सदरची बाब वादी यांनी त्यांच्या दाव्यामध्ये नमूद न केल्याने वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयासमक्ष आले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज हा कायदयातील तरतुदीप्रमाणे चालणेस पात्र नसून वादी यांनी दाखल केलेला दावा देखील रद्द होण्यास पात्र असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी केलेली आहे.

**७.** अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. दावा मिळकतीच्या सातबारा पत्रकी वादी यांचे पूर्व हक्कदार म्हणजेच त्यांचे वडील संपतराव राणे व अन्य सहहिस्सेदार यांची नावे नमूद असून प्रतिवादी यांच्या नावची नोंद इतर हक्कात कुळ म्हणून नमूद असल्याचे देखील दिसून येत आहे. प्रतिवादी यांचे कथनानुसार प्रतिवादी हे दावा मिळकतीमधील कुळ असून त्यांची वहिवाट दि.०१.०४.१९५७ या 'कृषक' दिनापूर्वीपासून दावा मिळकतीमध्ये असल्याकारणाने त्यांना टेनन्सी केस क्र.०४/१९९८ चे कामी कुळ म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे. सदर

कामी प्रतिवादी हे कुळ म्हणून व या दाव्यातील वादी यांचे वडील संपतराव राणे व अन्य सहहिस्सेदार मालक म्हणून सामील होते. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांची कुळ म्हणून वहिवाट असल्याची बाब वादी यांना माहित असतानाही त्यांनी प्रतिवादी यांचेविरूध्द प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

८. वादी यांच्या कथनाप्रमाणे सदर टेनन्सी केसच्या कामी वादी यांचे वडील पक्षकार नव्हते. परंतु, प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे वादी यांचे चुलते प्रतापराव बळवंतराव राणे यांनी प्रतिवादी यांचेविरूध्द दिवाणी न्यायालयात दाखल केलेल्या रे.दि.मु.नं.२६/२००० चे कामी मा.दिवाणी न्यायालयाने टेनन्सी क्र.०४/१९९८ मध्ये वादी यांचे वडील व अन्य सहहिस्सेदार तसेच प्रतिवादी यांचेदरम्यान असणारे न्यायनिर्णयाबाबत मजकुर नमूद करून सदर टेनन्सी केस कामी वादी यांचे वडील देखील पक्षकार असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच सदर टेनन्सी केसच्या विरूध्द झालेले टेनन्सी अपील क्र.२६/२००० चे अवलोकन केले असता, त्यामध्ये प्रतिवादी क्र.१४ म्हणून वादीचे वडील संपतराव राणे हे पक्षकार आहेत. तसेच मा.दिवाणी न्यायालयातील रे.दि.मु.नं.२६/२००० चे कामी प्रतिवादी क्र.१४ म्हणून संपतराव राणे यांच्या नावची नोंद असून त्यांना सदर दाव्यातून वादी म्हणजेच प्रतापराव राणे यांनी वगळले असले तरी सदर दाव्यातील न्यायनिर्णयाविरूध्द झालेल्या रे.दि.अ.क्र.२०४/२००३ चे कामी त्यांना प्रतिवादी क्र.१४ म्हणून सामील करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी व वादी यांचे पूर्व हक्कदार म्हणजेच दावा मिळकतीच्या सातबारा उताऱ्यावरती नमूद मालक व कुळ यांचेदरम्यान पूर्वी झालेल्या दाव्यांची व त्यातील निकालांची माहिती वादी व अन्य सहहिस्सेदारांना असल्याचे दिसून येत आहे. तसेच सदर न्यायनिर्णय वादी व प्रतिवादी यांचेवर बंधनकारक आहेत.

९. अभिलेखावरील दाखल टेनन्सी केस क्र.०४/१९९८, टेनन्सी अपील

क्र.२६/२०००, मा.दिवाणी न्यायालयातील रे.दि.मु.नं.२६/२००० व मा.जिल्हा न्यायालयातील रे.दि.अ.क्र.२०४/२००३ यामधील न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, दावा मिळकत ही मुलत: वादी यांचे वडील संपतराव राणे व अन्य सहहिस्सेदारांची मालकी वहिवाटीची मिळकत होय. दावा मिळकत व अन्य मिळकतींबाबत दावा मिळकतीचे सातबारा उताऱ्यामध्ये नमूद असलेले कुळ यांनी मुळ मालक यांचेविरूध्द टेनन्सी केस दाखल केली होती. त्याकामी प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी व त्यांचे पूर्व हक्कदार हे कुळ असल्याचे व त्यांची दावा मिळकत व अन्य मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट असल्याचे निष्कर्षित करण्यात आले. त्यानंतर मुळ मालक यांनी कुळांच्याविरूध्द दाखल केलेल्या दिवाणी दाव्यामध्ये देखील मा. दिवाणी न्यायालय यांनी दावा मिळकत व अन्य मिळकतीमध्ये कुळ म्हणजेच या दाव्यातील प्रतिवादी यांची कब्जे वहिवाट असल्याचा निष्कर्ष नोंदविला असल्याचे दिसून येत आहे. मा.दिवाणी न्यायालय यांच्या न्याय निर्णयाविरूध्द झालेल्या दिवाणी अपीलामध्ये देखील मा.जिल्हा न्यायाधीश सो यांनी देखील दावा मिळकत व अन्य मिळकतीमध्ये कुळ म्हणजेच या दाव्यातील प्रतिवादी यांची कब्जेवहिवाट असल्याचा निष्कर्ष नोंदविला असल्याचे दिसून येत आहे.

**१०.** अभिलेखावरील दाखल वर नमूद न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांची दावा मिळकतीमध्ये कुळ या नात्याने कब्जेवहिवाट असल्याचे यापूर्वीच न्यायनिर्णयीत झाले असल्याचे दिसून येत आहे. वादी यांचे कथनाप्रमाणे प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये कुळ असल्याने त्यांना वादी यांची पूर्वपरवानगी घेतलेविना दावा मिळकतीचे स्वरूप कोणत्याही प्रकारे बदलता येणार नाही. परंतु, ज्याअर्थी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांची कब्जेवहिवाट असल्याबाबतचा निर्णय दिवाणी न्यायालय व मा.जिल्हा न्यायालय यांनी घोषित केलेला आहे, त्याअर्थी दावा मिळकतीमध्ये असणारी कब्जेवहिवाट पूर्णत: उपभोगण्याचा अधिकार प्रतिवादी यांना असल्याचे

दिसून येत आहे. तसेच सदरची बाब वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान होणाऱ्या अंतिम पुराव्याअंती ठरणारी बाब असल्याचे दिसून येते. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादी यांची कब्जेवहिवाट असल्याची बाब वादी यांनी सबळ पुराव्याअंती सिध्द केली नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ज्याअर्थी, प्रतिवादी यांची दावा मिळकतीमध्ये मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कब्जेवहिवाट असल्याचे प्रतिवादी यांनी सिध्द केलेले आहे.

**११.** त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्रित विचार करता दावा मिळकत ही वादी यांच्या कब्जेवहिवाटीमध्ये असल्याची बाब वादी यांनी ज्याअर्थी प्रथमदर्शनी पुराव्यासह शाबित केली नाही, त्याअर्थी मनाई सारखी नैसर्गिक दाद वादीच्या हक्कात देणे न्यायोचित होणार नसल्याचे दिसून येत आहे. जर मनाईसारखी नैसर्गिक दाद वादीच्या हक्कात दिली, तर प्रतिवादी यांचे अतोनात नुकसान होणार असल्याचे दिसून येत आहे. परंतु, जर मनाई सारखी नैसर्गिक दाद वादीच्या हक्कात दिली नाहीतर, वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीकरीता मनाईसारखी नैसर्गिक दाद देण्याकरीता सबळ पुरावा अभिलेखावर सादर न केल्याने वादी यांनी प्रथमदर्शनी केस शाबित केली नसल्याचे दिसुन येत आहे व त्यामुळे दावा मिळकतीबाबत मनाईसारखी दाद देणे संयुक्तिक नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष '***नकारार्थी***'असा नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत:</u>**–

**१२.** मुद्दा क्र.१ बाबत दिलेल्या विवेचनावरुन न्यायाचा समतोल हा कोणाच्या बाजुने आहे याबाबत विचार करता असे दिसुन येते की, वादी यांची दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट असल्याबाबत कोणताही प्राथमिक पुरावा वादी यांनी अभिलेखावर सादर केला नसल्याचे दिसून येत आहे. वादी यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी हे त्यांचे दावा मिळकतीमध्ये असणारे

कब्जेवहिवाटीमधील असणाऱ्या मिळकतीमध्ये बांधकाम करत आहे परंतु, प्रतिवादी यांनी अभिलेखावर सादर केलेल्या न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांची कब्जेवहिवाट असल्याचे दिसून येत आहे. तसेच वादी यांचे अधिकारांना बाधा पोहचु नये याकरीता मनाईसारखी नैसर्गिक दाद देण्याकरीता सबळ पुरावा वादी यांनी अभिलेखावर आणला नसल्याचे दिसुन येते. जर वादी म्हणतात त्याप्रमाणे मनाई सारखी नैसर्गिक दाद दावा मिळकतीबाबत त्यांचे हक्कात न दिल्यास वादी यांचे अतोनात कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ बाबत दिलेल्या स्पष्टीकरणाचा तसेच वर नमुद कारणांचा विचार करता न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजुने असल्याचे सिध्द करण्यास वादी प्रथमदर्शनी यशस्वी झालेले नाहीत. त्यामुळे सोयीचा समतोल हा वादीचे बाजुने असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज दावा मिळकतीबाबत नामंजुर केल्यास निश्चितच वादीस अपाय होईल असे दिसुन येत नाही. याउलट जर वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर केला तर प्रतिवादीचे अतोनात कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यामुळे न्यायाचा समतोल वादीच्या लाभात असल्याचे शाबित करण्यास वादीना यश आल्याचे दिसुन येत नाही. त्याकारणास्तव मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष '***नकारार्थी***'असा नोंदविण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.३ करीता:-**

**१३.** कायद्यान्वये प्रत्येकास आपली मालमत्ता ही उपभोगण्याचा अधिकार आहे. तसेच त्याची कायदेशीरपणे विल्हेवाट लावण्याचाही अधिकार आहे. त्यामुळे एखाद्यास कोणत्याही प्रथमदर्शनी भक्कम कारणाव्यतिरिक्त त्याच्या सदर हक्कापासुन रोखुन ठेवणे हे संयुक्तीक होणार नाही. वादीने आपली केस ही प्रथमदर्शनी शाबीत केली नाही. त्याबाबत न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजुने दिसुन येत नाही. त्यामुळे जर तुर्तातुर्त मनाई हुकुम हा वादीच्या हक्कात दावा

मिळकतीबाबत मंजुर केला नाही तर निश्चितच वादीचे नुकसान होण्याची शक्यता ही दिसुन येत नाही. त्यामुळे वादीने दावा मिळकती बाबत तुर्तातुर्त मनाई हुकुम त्यांच्या बाजुने मंजुर न केल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे शाबित केलेले नाही. सबब मुद्दा क्रमांक ३ चा निष्कर्ष '***नकारार्थी***' असा नोंदविण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.४ करीता–**

**१४.** सकृतदर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरिमित नुकसान या तिन्ही संज्ञा केवळ अलंकारिक भाषेचा नमुना नसुन सदर तिन्ही संज्ञांना विशिष्ट महत्व आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सदर तिन्ही संज्ञा अर्जदाराच्या लाभात असल्याचे शाबीत करण्यास त्यांना यश आलेले नाही. त्यामुळे मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी असे नोंदविण्यात आलेले आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा मनाई अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब मुददा क्र. ४ च्या उत्तरा दाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

–::– **आदेश** –::–

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

सही/–

( जी.ए.कुलकर्णी )

दिनांकः–२४.१२.२०२५. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.